नि. फौ. ख. क्र.१९२/२०१७ निशाणी ४१

**सरकार तर्फे साक्षीदार क्र. ७ यांचा जबाब**
**मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,**

नाव – संजय नामदेव कुंभार

वय – ६० वर्षे, व्यवसाय – सेवानिवृत्त, सहा. पो.उप नि. पोलीस स्टेशन, अकोट फाईल, अकोला

पत्ता – लहान उमरी, अकोला, ता. जि. अकोला.

**सरकार तर्फे सरकारी वकिल श्रीमती एस. आर.लोखंडे यांचे मार्फत सरतपास सुरुः**

१. दि. ०३.०२.२०१७ रोजी मी पोलीस स्टेशन, उरळ येथे पो.हवा. या पदावर हातरुन बीट इन्चार्ज म्हणुन कार्यरत होतो. त्यावेळी अप क्र. २७/२०१७ चा तपास माझ्याकडे आला, त्यामध्ये मला लेखी रिपोर्ट, प्रथम खबरी अहवाल असे दस्तावेज प्राप्त झाले. त्या दिवशी घटनेची माहिती पी.एस.आय. श्री.साठवणे यांना एल.सी.बी.पी.एस.आय.श्री. नावकारकडुन मिळाली होती. त्यांनी सांगितले की, हातरुन येथील सादीक अहेमदच्या शेतात ४०–४५ बैल बांधुन ठेवण्यात आलेले आहेत. माहिती मिळाल्यानंतर श्री.साठवणे घटनास्थळावर गेले. उरळ ठाणेदार यांनी आम्हाला घटनास्थळावर जाण्यास सांगितले म्हणुन मी व माझे रायटर असे घटनास्थळावर गेलो. आम्ही जावुन पाहिले असता त्या ठिकाणी बरीच गर्दी जमा झाली होती. आम्ही ठाणेदार यांना त्या ठिकाणी अतिरिक्त स्टाफची आवश्यकता असल्याचे सांगितले. त्यामुळे स्वतः ठाणेदार साहेब आणि इतर स्टाफ तेथे आला. श्री. साठवणे याचे सोबत शेतात गेलो असता तेथे ४ शेतकऱ्यांचे बैल चरत होते, त्यापैकी ६ बैल सादीक अहेमदचे होते. सदरचे बैल कत्तल करण्याच्या उद्देशाने बांधुन ठेवले होते. श्री. साठवणे यांनी दोन पंचां समक्ष मला ६ बैल ताब्यात दिले, त्यानंतर ती सदर ६ बैलांचा जप्ती पंचनामा केला. तसेच मी त्या ठिकाणी घटनास्थळाचा पंचनामा केला. मला सदर जप्ती आणि घटनास्थळ पंचनामे दाखविण्यात आले. त्यावर माझ्या व पंचांच्या सह्या आहेत. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यांना अनुक्रमे **नि.क्र. ४२ व ४३** देण्यात येते. त्यानंतर मी जप्त बैलांना गौरक्षण संस्थेच्या ताब्यात दिले आणि श्री. साठवणे यांनी सदर घटनेचा रिपोर्ट दिला. त्यानंतर मी फिर्यादी आणि साक्षीदारांचे बयान नोंदविले. आरोपींविरुध्द पुरावा मिळुन

आल्याने दोषारोपपत्र दाखल केले. मी आरोपीला ओळखतो. आरोपी आजरोजी न्यायालयात हजर आहे.

सरतपास पूर्ण.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एन.एन.जामोदे यांचे मार्फत</u>**

२. कोणत्याही गुप्त बातमीची रवानगी टाकुन स्टेशन डायरीला नोंद केली जाते. साधारणतः पेट्रोलिंग डयुटीला जात असतांना सरकारी वाहनाने गेल्यास त्याची नोंद तसचे कर्मचाऱ्यांच्या नावाची नोंद स्टेशन डायरीत केली जाते. साक्षीदार स्वतःहून सांगतात की, खाजगी वाहनाने गेल्यास त्याची नोंद देखील स्टेशन डायरीत केले जाते. हे म्हणणे खरे आहे की, खाजगी वाहनाने गेल्यास वाहनाचा क्रमांक, मालक, चालक यांच्या नावाची नोंद स्टेशन डायरीत केली जाते. कोणत्याही गुन्हयाचा तपास करुन परत आल्यानंतर त्याची स्टेशन डायरीत नोंद घेतली जाते.

३. हातरुन मोठे गाव असुन तेथे गुराढोरांचा आठवडी बाजार भरतो. हे म्हणणे खरे आहे की, तेल्हारा तालुक्यातील हिवरखेड गावातील आठवडी बाजारात गुराढोरांची खरेदी विक्रीसाठी बाजार भरतो. हे म्हणणे खरे आहे की, विक्री करण्यासाठी जास्त गुरेढोरे असल्यास त्यांना बाजारात हाकलत आणावे लागते किंवा शेतामध्ये बांधुन ठेवावे लागते किंवा कळपात जमा करावे लागतात. शेतकऱ्याचे पिकाचे नुकसान होवु नये म्हणुन जनावरांना गळयाला दोरखंड बांधुन आणावे लागतात. हे म्हणणे खरे नाही की, प्रत्येक जनावराला बांधण्यासाठी नाक कसले जाते आणि मोरखे बांधले जाते. काही जनावरांना गळयात लोळणे बांधलेले असते. हे म्हणणे खरे नाही की, या सर्व बाबी प्राण्यांच्या निदर्यतेच्या वागणुकीमध्ये बसत नाही. आरोपीकडे किती शेती आहे, त्याची चौकशी मी केली नाही, तसेच त्याबाबतचे दस्त मी प्राप्त करुन घेतले नाही.

प्रश्न – तपासात तुम्ही जनावरांचे मालकी हक्काबाबतचे दस्त प्राप्त करुन घेतले नाही ?

उत्तर – मी जनावरांच्या मालकांकडे चौकशी केली होती, त्यांचे बयान नोंदविले, परंतु त्यांच्या मालकीचे दस्त प्राप्त करुन घेतले नाही.

साक्षीदार पुन्हा सांगतात की, मी ज्या शेतकऱ्यांकडे चौकशी केली, त्यांचे बयान नोंदविले नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतात की, मी आजुबाजुतील शेतकऱ्यांचे बयान नोंदविले. मी अभिलेख पाहुन सांगतो की, मी आजुबाजुतील शेतकऱ्यांकडे विचारपुस केली

होती, त्यांचे बयान नोंदविले नाही. मी स्थानिक गुन्हे शाखेकडुन रेड संबंधीचे दस्त तपासा दरम्यान प्राप्त करुन घेतले नाही. हे म्हणणे खरे आहे की, गुन्हा घडल्या त्या दिवशी आरोपी तेथे हजर नव्हता. साक्षीदार स्वतःहून सांगतात की, गुन्हा दाखल झाल्यानंतर आरोपीला त्याच दिवशी अटक केली. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळावर मोठा जमाव झाल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी साक्षीदारांचे बयान माझ्या मनाप्रमाणे नोंदवुन घेतले. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगतो त्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नाही.

४. हे म्हणणे खरे नाही की, मी साक्षीदारांचे बयान माझे मनाप्रमाणे पोलीस स्टेशन मध्ये बसुन नोंदवुन घेतले. हे म्हणणे खरे नाही की, चुकीच्या व खोटया माहितीच्या आधारे मी तथाकथित गुन्हा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगतो त्या प्रमाणे कोणतेही बैल जप्त केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी कोणताही घटनास्थळ व जप्ती पंचनामे केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, असा कोणताही गुन्हा घडला नसल्यामुळे मी बैलांच्या मालकीचे दस्त प्राप्त करुन घेतले नाही व स्टेशन डायरीच्या नोंदी दोषारोपपत्रासोबत दाखल केलेल्या नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा तपास करुन आरोपींविरुध्द खोटे दोषारोपपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे सरतपासातील संपुर्ण मजकुर मी खोटा सांगितला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीविरुध्द आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत
समक्ष

PATIL DIPMALA MAHENDRA
Digitally signed by PATIL DIPMALA MAHENDRA
Date: 2026.01.22 15:52:47 +0530

(श्रीमती डी. एम. पाटील)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर.

बाळापूर.
दि. २१/०१/२०२६